**सुविचार**
जहाँ बुद्धि प्रयोग करने की आवश्यकता है, वहाँ बल प्रयोग करने से कोई लाभ नहीं होता ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १५ सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-२०० ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीरच्या बरबादीला तिन्ही कुटुंबे जबाबदार

डोडा : जम्मू-काश्मीरला काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीच्या घराणेशाहीने उद्ध्वस्त केले आहे. या तिन्ही कुटुंबांनी मिळून तुमच्यावर जो अन्याय केला आहे, तो पापापेक्षा कमी नाही. अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीरच्या बरबादीला तिन्ही कुटुंबे जबाबदार आहेत, असा घणाघाती हल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चढवला. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी मोदी यांची शनिवारी (दि. १४) डोडा येथे रॅली काढण्यात आली. त्यानंतर ते सभेत बोलत होते.

सभेला संबोधित करताना ते पुढे म्हणाले की, आम्ही आणि तुम्ही मिळून सुरक्षित काश्मीर बनवू, ही मोदींची हमी आहे. यावेळी जम्मू-काश्मीरच्या निवडणुका भविष्याचा फैसला करणार आहेत. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक तीन कुटुंब आणि जम्मू-काश्मीरच्या तरुणांमध्ये आहे. एका बाजूला तीन कुटुंबे, तर दुसऱ्या बाजूला स्वप्ने घेऊन निघालेली तरुण मंडळी. या तीन कुटुंबांनी येथे भ्रष्टाचाराला खतपाणी घातले. जमीन हडप करणाऱ्या टोळ्यांना प्रोत्साहन दिले. तुम्हाला छोट्या सुविधांसाठी तळमळ करायला लावली होती. या तिन्ही कुटुंबातील लोकांनाच सरकारी नोकऱ्यांमध्ये भरती करण्यात आल्याचा आरोप मोदींनी यावेळी केला.



काश्मिरी पंडितांबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले की, तीन दशकांहून अधिक काळ झाला, या दिवशी आमचे काश्मिरी पंडित टिकलाल टपलू यांना दहशतवाद्यांनी शहीद केले. त्यांच्या हत्येनंतर काश्मिरी पंडितांवर अत्याचाराची न संपणारी मालिका सुरू झाली आहे. भाजपने काश्मिरी पंडितांसाठी आवाज उठवला आणि त्यांना पाठिंबा दिला. काश्मिरी हिंदूंच्या वापसी आणि पुनर्वसनासाठी टपलू योजना बनवण्याचे काम करण्यात आले आहे.

**दहशतवाद शेवटचा श्र्वास मोजतोय**

पंतप्रधान पुढे म्हणाले की, जम्मू-काश्मीरमधील तीन कुटुंबांनी येथे फुटीरतावाद आणि दहशतवादासाठी मैदान तयार केले. याचा फायदा देशाच्या शत्रूंनी घेतला. त्यांचा कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय चालू राहावा यासाठी हे लोक दहशतवादाला खतपाणी घालत होते. त्यांच्या गुन्ह्यांमुळे आमच्या मुलांना जीव गमवावा लागला. ही चंद्रभागा दरी वर्षानुवर्षे चाललेल्या दहशतवादाच्या कालखंडाची साक्षीदार आहे. दिवस उजाडताच अघोषित कर्फ्यू लागू करण्यात आला होता तो काळ आठवा. सर्व दुकाने ठप्प झाली, सर्व कामे ठप्प झाली. तेव्हा केंद्र सरकारचे गृहमंत्रीही लाल चौकात जाण्यास घाबरत होते. येथे दहशतवाद आता शेवटचे श्वास मोजत आहे.

गेल्या १० वर्षात जम्मू-काश्मीरमध्ये जो बदल झाला आहे तो स्वप्नापेक्षा कमी नाही. पूर्वी पोलिस आणि सैन्यावर दगडफेक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दगडांनी नवीन जम्मू-काश्मीर तयार होत आहे. हे सर्व **(पान ७ वर)**

## निवडणुकीसाठी काँग्रेसने कंबर कसली; राहुल गांधी, प्रियंकाचा महाराष्ट्रात तळ

मुंबई : - विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनेही कंबर कसली आहे. लोकसभा निवडणुकीत मोठं यश मिळाल्यानंतर काँग्रेस आता महाराष्ट्रात मोठा डाव टाकण्याच्या तयारीत आहे. राज्यात जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी काँग्रेसने मेगा प्लान तयार केला आहे.



या प्लॅननुसार काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी हे महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत तळ ठोकणार आहेत. दोन्ही नेते महाराष्ट्रावर सर्वाधिक फोकस करणार असून राज्यात जास्तीत जास्त सभा घेणार आहेत. याशिवाय काँग्रेसच्या इतर वरिष्ठ नेत्यांचेही महाराष्ट्रावर लक्ष असणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या सभांचा महाराष्ट्रात धडाका उडवून देण्यात येणार आहे. राज्यात या दोन्ही नेत्यांच्या १५ ते २० सभा होणार आहेत. दोन्ही नेते प्रत्येक विभागात सभा घेणार आहेत. सोबतच काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्यांच्या देखील सभा होणार आहेत. सभांच्या अनुषंगाने राज्यातील नेत्यांनी केंद्राला आज सविस्तर माहिती दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, काँग्रेस नेते आणि राज्याचे **(पान ७ वर)**

## सद्गुरू श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर

### पुरस्कार समारंभाचे चिफ गेस्ट म्हणून त्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण व त्यांनाहि पुरस्कार दिला जाणार असा दुहेरी योग

मुंबई / प्रतिनिधी- येथील आघाडीचे दैनिक आफ्टरनून वाईस यांच्या वतिने आध्यात्म, भक्ती आणि सांस्कृतिक संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल दिला जाणारा महाराष्ट्र रत्न पुरस्कार श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे पंढरपुर समितीचे सहअध्यक्ष तथा श्री नाथ संस्थान औसाचे अध्यक्ष सद्गुरू.श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांना जाहीर करण्यात आला आहे.



मुंबई येथे दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ०५ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, नरिमन पॉईंट येथे या पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात येणार आहे. पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने दिलेल्या सर्व जवाबदार्याचे उत्कृष्ट कार्य व वारकरी सांप्रदयात दिलेल्या समर्पणाबद्दल औसेकर महाराजांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे दैनिकाचे मुख्य संस्थापक संपादक डॉ.वैदही तमन यांनी सांगितले आहे. औसेकर महाराज यांना यापूर्वी पूणे येथे शांतिदूत परिवाराच्या वतिने महाराष्ट्र भूषण पुरस्कार तर वारकरी संप्रदायातील मानाच समजला जाणारा वारकरी पुरस्कार मिळाला आहे तसेच काशी पिठ, केदार पिठ, रंभापूरी पिठ, अक्कलकोट देवस्थान यांच्या वतिनेही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## काही नेत्यांकडून सत्तेसाठी मराठ्यांचा वापर होत असल्याने युवकांनी सावध रहावे - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) - काही नेत्यांकडून केवळ सत्ता मिळण्यासाठी मराठा समाजाचा उपयोग केला जात आहे. आरक्षण देताना एका समाजाला न्याय व दुसऱ्या समाजावर अन्याय होऊ देणार नाही. मात्र विरोधक सत्तेच्या हवासापोटी समाजाचा कसा वापर करता येईल याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे युवकांनी अशा लोकांपासून सावध रहावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दि.१४ सप्टेंबर रोजी केले.

पार पडलेल्या शिवसेनेच्या मेळाव्यात स्पष्ट केली. शिवसेनेत नुकतेच प्रवेश केलेले भाजप नेते तथा आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील यांच्या पुढाकारातून धाराशिव शहरा लगत असलेल्या हातलाई मंगल कार्यालयात आयोजित शिवसैनिकांच्या मेळाव्यात ते



बोलत होते. यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरज साळुंके, संपर्कप्रमुख अनिल खोचरे, नितिन लांडगे, योगेश केदार आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना शिंदे म्हणाले, महायुती सरकारने मराठा समाजासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. महायुतीचे सरकार आल्यानंतर पहिल्यांना १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. याच्या माध्यमातून ५ हजार मराठा युवकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. विरोधकांकडून केवळ आरक्षण टीकणार नाही, अशी टीका केली जात होती. आजपर्यंत आरक्षणाला कसलाही धक्का लागला नाही. पुढेही आरक्षणाला कसलाच धोका नाही. कायद्याच्या कसोटीवरून उतरवून हे आरक्षण देण्यात आले आहे. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील एक लाख मराठा युवकांना १५ लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज देण्यात आले आहे. आतापर्यंत कधीच दिल्या नाहीत तितक्या मराठा समाजासाठी सवलती महायुती सरकारने दिल्या आहेत. विरोधक केवळ राजकीय भांडवल करत आहेत. मराठा आरक्षणासंदर्भात कोणत्याही विरोधी पक्षाने आपली भूमिका स्पष्ट केली नाही. केवळ मराठा समाजाचा सत्ता मिळण्यासाठी उपयोग केला जात आहे, अशी टीकाही एकनाथ शिंदे यांनी केली.

**राहुल गांधींकडून देशाचा अपमान**

**(पान ७ वर)**





**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे हे परांडा येथे जाण्यासाठी लातूर विमानतळावर आले असता संपर्कप्रमुख म्हणून ड बळवंत जाधव यांनी त्यांचे स्वागत करून जिल्हाधिकारी यांनी लातूर जिल्हा रुग्णालयाच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांना फंडाबाबत आठवण करून दिली असता मुख्यमंत्र्यांना सदरील काम त्वरित करण्याविषयी विनंती केली जिल्हाधिकारी आणि अत्यंत प्रभावीपणे लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मुख्यमंत्र्यांसमोर मांडला त्यांचे आभार.**

## तुळसीदासजी गंगणे यांचे निधन



लातूर : महाराष्ट्र परिवहन महामंडळातील निवृत्त अधिकारी तुळसीदासजी जनार्दनराव गंगणे (रा. साळे गल्ली) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने वयाच्या ६६ व्या वर्षी निधन झाले.

त्यांच्यावर मारवाडी स्मशानभूमीत शनिवार (दि.१४) रोजी सकाळी साडे दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा वकील मंडळाचे सचिव ॲड. प्रदीपसिंह गंगणे यांचे ते वडील होत. त्यांच्या दुःखात दैनिक यशवंत परिवार सहभागी आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लातूर विमानतळावर स्वागत





लातूर, / प्रतिनिधी- धाराशिव जिल्ह्यातील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लातूर विमानतळावर आगमन झाले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूर शहर महानगरपालिका उपायुक्त पंजाबराव खानसोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह विविध पदाधिकारी यावेळी उपस्थिती होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचे लातूर विमानतळ येथून हेलिकॉप्टरने धाराशिव जिल्ह्यातील परांडाकडे प्रयाण केले. परांडा येथे होत असलेल्या मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रम आणि धाराशिव येथील शिवसेना पक्षाच्या मेळाव्याला उपस्थित राहतील. त्यानंतर सायंकाळी ४.१५ वाजता मुख्यमंत्री यांचे लातूर विमानतळ येथे आगमन होईल व विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

## आ. अमित देशमुख यांच्या हस्ते काका गणेश मंडळाच्या श्रीची महाआरती

लातूर : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी लातूर शहरातील प्रकाश नगर भागातील श्री दत्त मंदिर या ठिकाणच्या काका गणेश मंडळास भेट दिली.

या वेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी काका गणेश मंडळाच्या श्रीचे मनोभावे दर्शन घेत श्री गणेशाची महाआरती केली.तसेच काका गणेश मंडळाकडून आयोजित ह.भ.प.गुरुबाबा औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाच्या कार्यक्रमास उपस्थिती लावून चक्रीभजनाचा लाभ त्यांनी यावेळी घेतला. दरम्यान यावेळी गणेश मंडळासाठी देणगी दिलेल्या भक्तांमधून लक्की ड्रॉ काढून ११ मुलींना सायकल वाटप करण्यात आली.



यावेळी बोलताना ह.भ.प.गुरुबाबा औसेकर महाराज म्हणाले की, राजकीय परंपरा असलेले, अनेक वर्षे विविध क्षेत्रात आपली ओळख निर्माण करणाऱ्या घरान्यातील सदस्य माजी मंत्री आमदार अमित देशमुख असून ते आज आपल्या सोबत या ठिकाणी आहेत. राजकीय क्षेत्रात त्यांनी आपले एक वलय निर्माण केले आहे आणि भावी पिढी मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे पाहत आहे असे म्हणत माजी मुख्यमंत्री आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख यांच्या आठवणीना उजाळा दिला. पुढे बोलताना ते म्हणाले की,सामाजिक कार्य करताना यासोबतच राजकीय शक्ती आपल्या सोबत असावीच लागते आणि तेच सूर्यकांत कातळे करीत आहेत त्यांना आपण साथ द्यावी.आज सर्वत्र प्रदूषण मोठ्या प्रमाणावर झाले असून यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सायकलचा वापर वापर करायला हवे असे आवाहन करीत सर्वाना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमीत विलासराव देशमुख म्हणाले की, भव्यतेची परंपरा, संस्कृतीची जोपासना हे ब्रीद वापरून काका गणेश मंडळ आपले कार्य अविरतपणाने करत आहे याचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. काका गणेश मंडळाच्या सदस्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. सामाजिक बांधिलकी जपत मुलींना ११ सायकल चे वाटप या वर्षी केले जात आहे येणाऱ्या काळात किमान ५० सायकल मुलींना वाटप केल्या जातील असा विश्वास आहे.

आगामी काळात विधानसभा निवडणूक होत असून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणून महाराष्ट्र राज्यावर चे विघ्न दूर **(पान ७ वर)**



## डॉ.अर्चना पाटील चाकूरकर यांच्या हस्ते विजय जी. एन. एम. नर्सिंग स्कुलच्या श्रीगणेशाची आरती

लातूर : श्री दादासाहेब शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित विजय जी. एन. एम. नर्सिंग स्कुलच्या श्रीगणेशाची आरती शुक्रवारी सकाळी भाजपच्या लातूर विधानसभा निवडणूक प्रमुख डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते करण्यात आली.

याप्रसंगी लातूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक संगीत रंदाळे, भाजप नेते माणिकराव आलोरे महापूरकर, चोथवे , श्री दादासाहेब शिक्षण प्रसारक मंडळ लातूर या संस्थेच्या अध्यक्षा सौ. अंजली शरदराव जाधव किनीकर , संस्थेचे सचिव शरद विजयकुमार जाधव किनीकर, संस्थेचे कोषाध्यक्ष दिग्विजय शरदराव जाधव किनीकर, नर्सिंग स्कुलचे तज्ञ संचालक श्यामभाऊ चव्हाण, मनोज अडाणे, बसवराज बिराजदार , आप्पाराव पाटील जमालपूरकर , प्राचार्य सिद्धेश्वर नागरगोजे , वरिष्ठ लिपिक मोहित भालेराव यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी - विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने डॉ.अर्चनाताई पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आज सर्वत्र रुग्णांना चांगली सेवा देण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षित व तज्ज्ञ नर्सिंग स्टाफची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने विजय जीएनएम नर्सिंग स्कुलच्या माध्यमातून चांगला नर्सिंग स्टाफ प्रशिक्षित करण्यासाठी केले जात असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत असे सांगितले. संस्थेच्या कार्याची माहिती सचिव शरद जाधव यांनी दिली.

दैनिक
यशवंत
# अहमदपूर/चाकूर परिसर
रविवार दि.१५ सप्टेंबर २०२४


E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

## सौ. कौशल्याबाई सोनकांबळे यांचे दुःखद निधन



अहमदपूर दि.१४(प्रतिनिधी): सौ. कौशल्याबाई सोनकांबळे यांचे दुःखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, निलंगा येथील बालाजी नगर मध्ये वास्तव्यास असलेल्या सौ. कौशल्याबाई रमेश सोनकांबळे यांचे गुरुवार, दि. १२ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर येथील रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर निलंगा येथील शांतीवन स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुली, एक मुलगा, जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे. सौ. कौशल्याबाई सोनकांबळे या विधीज्ञ रमेश सोनकांबळे यांच्या पत्नी असून शिक्षक सुधीर सोनकांबळे यांच्या सासुबाई होत. त्यांच्या मृत्युमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## हॉस्टेल कामगाराच्या लेकराच्या वैद्यकीय प्रवेशासाठी लोक झाले मायबाप!


### मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.गोविंद शेळके यांच्या आव्हानाला चांगला प्रतिसाद

अहमदपूर दि.१४(बालाजी कारामुंगीकर): हॉस्टेल कामगाराच्या लेकराच्या वैद्यकीय प्रवेशासाठी लोक झाले मायबाप झाले असुन मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.गोविंद शेळके यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आर्थिक मदतीचे आवाहन केले होते त्यास चांगला प्रतिसाद मिळाला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, एका हॉस्टेल वरील कामगाराच्या मुलाचे वैद्यकीय (एमबीबीएस) प्रवेशासाठी पहिल्याच यादीत पात्र ठरूनही केवळ घरची आर्थिक परिस्थिती नसल्याने ओम आडकिने या होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न भंगण्याची भीती निर्माण झाली होती.त्याचे स्वप्न साकार होण्यासाठी दानशूर व्यक्तींनी त्याला मदतीचा हात देऊन आर्थिक साहाय्य करावे, असे आवाहन मराठा सेवा संघाचे लातूर जिल्हा कार्याध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते प्रा. गोविंद शेळके यांनी समाज माध्यमातून केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत मायबाप जनतेमुळे अखेर त्या विद्यार्थ्याचा पंजाबराव देशमुख मेडीकल कॉलेज अमरावती येथे एम.बी.बी.एस साठी प्रवेश निश्चित झाला.

गुंटूर ता. जि. नांदेड येथील रहिवासी असलेले सुरेश अडकीने हे नांदेड मधील एका हॉस्टेल मध्ये दोन वर्षापासून कामाला आहेत. त्यांचा मुलगा ओम याने १२ वी चा अभ्यास करून मनीटफ परिक्षेत ६१३ गुण घेऊन प्राविण्य प्राप्त केले असले तरी यावर्षीच्या वाढत्या कट ऑफ मुळे ६१३ गुणाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळू

**ऐसे ही कारवा नही रुकता.... देखा ये भी जाता है की आवाज किसने दी...!**





शकला नाही. निम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पात्र ठरूनही प्रवेश घेण्याची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे वैद्यकीय शिक्षणाच्या स्वप्नावर पाणी सोडण्याची वेळ आली होती. ओमचे वडील सुरेश आडकीने रा. गुंटूर ता. जि. नांदेड यांनी अहमदपूर येथील मराठा सेवा संघाचे लातूर जिल्हा कार्याध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते प्रा.गोविंद शेळके व कंधार मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष नामदेव कुटे सर यांना संपर्क करत आपली कैफियत मांडली, व आर्थिक मदत करण्याची विनंती केली होती. प्रा. शेळके यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखुन संबंधीत मुलाच्या कुटूंबीयांची चर्चा करून तातडीने समाज माध्यमावर मदतीचे नम्रपणे आवाहन केले. ओमला पुढील दोन दिवसांमध्ये सात लाख रुपये रक्कम जमा करावयाची होते परंतु त्याच्याकडे सध्या फक्त दोन लाख रुपये जमा झाले होते.उर्वरित रक्कम जमा न झाल्यास जिद्दीने अभ्यास करणाऱ्या ओमच्या मेडिकल प्रवेशाची संधी हुकू नये याकरीता स्वेच्छेने आर्थिक मदत पाठवण्याचे आवाहन करत अडकीणे याचा अकाउंट नंबर व फोन पे नंबर दिला होता. यानंतर अनेक राजकीय, सामाजीक व संवेदनशील नागरिक त्या मुलाचे मायबाप होण्यास पुढे सरसावले.

जमा झालेला जवळपास तीन लाख रूपयाचा निधी त्याच्या खाती परस्पर जमा करण्यात आला. विशेष म्हणजे या सत्कार्यास सर्वच स्तरातून देणगी मिळाली. गरीबाच्या लेकराचे वैद्यकीय शिक्षणाचा (एम.बी.बी.एस.) प्रवेश निश्चित झाला. शिवाय समाजामध्ये अजून माणुसकी जिवंत आहे याची प्रचिती आली. विविध स्तरातून समाज माध्यमांचे व विद्यार्थीनींचे कौतूक केले जात असुन समाज माध्यमाचा असाही चांगल्या कामासाठी उपयोग होऊ शकतो, हे पुन्हा एकदा प्रा.गोविंद शेळके यांनी सिद्ध करून दाखवल्याचे सर्वत्र कौतूक होत आहे.

### सालगड्याच्या मुलीचे लोक झाले होते मायबाप

यापूर्वी २२ फेबुवारी २०२२ रोजी सामाजिक कार्यकर्ते प्रा.गोविंद शेळके यांनी एका सालगड्याच्या मुलीला मेडिकलच्या प्रवेशासाठी संवेदनशील लोकांना साद घातली आणि एका रात्रीतून लोकांनी साडेतीन लाख रुपये गोळा करून लोकवाटा दिला. मेडिकलचा प्रवेश निश्चित केला. ही मुलगी जळगाव येथे उल्हास पाटील मेडिकल कॉलेज मध्ये एम.बी.बी.एस. च्या तृतीय वर्षामध्ये शिक्षण घेत आहे.

## यशवंत ज्यु. कॉलेज येथे हिंदी दिवस साजरा

### भाषण स्पर्धेत पाचंगे कृष्णा प्रथम, मंडले विद्या व्दितीय, तर लष्करी हबीबा, साबळे धनश्री तृतीय

अहमदपूर दि.१४(प्रतिनिधी): येथील यशवंज ज्यु. कॉलेज येथे हिंदी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी घेण्यात आलेल्या भाषण स्पर्धेत पाचंगे कृष्णा प्रथम, मंडले विद्या व्दितीय, तर लष्करी हबीबा तृतीय आले आहेत.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, येथील यशवंत ज्यु. कॉलेज येथे हिंदी दिवसाचे औचित्य साधुन हिंदी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी घेण्यात आलेल्या भाषण स्पर्धेच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. सय्यद एम.यू. हे होते तर यावेळी मंचावर विज्ञान प्रमुख दिनेश तोंडारे, प्रा. घटकार शिवाजी, डॉ. बालाजी कारामुंगीकर आदींची उपस्थिती होती.



यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना हिंदीचे महत्व पटवुन सांगत असताना उपप्राचार्य प्रा. सय्यद एम. यू. म्हणाले की, हिंदी भाषा ही अनेक रुपात वावरत असुन राष्ट्रभाषा, राजभाषा, संपर्क भाषा, विश्वभाषा अश्या अनेक रूपात हिंदी भाषा जनमानसामध्ये लोकप्रिय आहे. हिंदी भाषा ही पातंत्र्यातून भारतीयांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोलाचे योगदान दिलेली भाषा आहे. भारत हा विविध धर्म, जाती, वंश, वर्ग यात विभागला असुन या सर्वांना एकतेच्या सुत्रामध्ये बांधण्याचे कार्य हिंदी भाषा करते. असेही प्रा. सय्यद एम. यू. हे शेवटी म्हणाले.

सदरील भाषण स्पर्धेत पाचंगे कृष्णा प्रथम, मंडले विद्या व्दितीय, तर लष्करी हबीबा तृतीय आले असुन उत्तेजनार्थ ढोबळे नंदिनी सतिश, वाघंबर शुभांगी संजय, शेख मुजन्ना युनूस, बनसोडे पायल महादेव, सावंत वैष्णवी गोविंद, घोरपडे ओमकार आंबादास, सय्यद जिया बिलाल, डुबुकवाड ओमकार, भगत दिपा भोजाराम ठाकरे कोमल नारायण हे विद्यार्थी आले असुन बट्टलवाड गोपाळ मारोती, सुरनर खंडेराव राम यांनीही सहभाग नोंदविला. हिंदी दिवसानिमित्त डॉ. बालाजी कारामुंगीकर यांचा कॉलेज व विद्यार्थ्यांच्या वतिने सत्कार करण्यात आला.

सदरील भाषण स्पर्धेचे परीक्षण प्रा. शिवाजी घटकार यांनी केले. संचलन व आभार डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर यांनी मानले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## राज तिलक युवा गणेश मंडळाच्या वतीने पत्रकारांच्या हस्ते वृक्षारोपण



अहमदपूर दि.१४(प्रतिनिधी): राज तिलक युवा गणेश मंडळाच्या वतीने पत्रकारांच्या हस्ते वृक्षारोपण

अहमदपूर दि. १३ (बालाजी कारामुंगीकर) राज तिलक युवा गणेश मंडळाच्या वतीने पत्रकारांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर नगर, थोडगा रोड, अहमदपूर येथे दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. विश्वंभर स्वामी, सहसचिव बालाजी तोरणे पाटील, प्रा. दिलीप भालेराव, डॉ. बालाजी कारामुंगीकर, बालाजी पारेकर, नागसेन गायकवाड इत्यादी पत्रकारांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी राज तिलक गणेश मंडळाचे पदाधिकारी साईप्रसाद देबडवार, शिवप्रसाद कोनाले, शिवलिंग टोपारे, विधीज्ञ स्वप्निल व्हत्ते , अभिषेक भुसारे, सचिन फुगणर, संकेत बेल्लाळे, भगतसिंह कच्छवे, साईप्रसाद पुठ्ठेवाड, अभिषेक आरदवाड, अमर पाटील , कपिल शेंबाळे, विशाल राठोड, वैजनाथ होनराव, बालाजी कासले, श्याम आगलावे, सोमनाथ स्वामी, शिवाजी तुपकर, पांडुरंग जगताप आदींची उपस्थिती होती.

## एकसंघ राष्ट्र निर्मितीमध्ये हिंदीचे मोठे योगदान - डॉ. राजकुमार जाधव

अहमदपूर दि.१४(प्रतिनिधी): भारतासारख्या विविधतेने नटलेल्या, विस्तीर्ण भूभागावर पसरलेल्या देशाला एकत्र ठेवण्यात, एकसंध राष्ट्र निर्मितीच्या कार्यात हिंदीचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन ढोकी येथील वसंतराव काळे महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. राजकुमार जाधव यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या महिंदी दिवस समारोहफ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते, तर किसान विचारपीठावर उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी, हिंदी विभाग प्रमुख डॉ.नागराज मुळे, सहयोगी प्राध्यापक डॉ. पांडुरंग चिलगर यांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. जाधव म्हणाले की हिंदी ही भारतातील रोजगाराची प्रमुख भाषा असून, जगात सर्वत्र हिंदीचा अभ्यास सुरू आहे. पत्रकारितेबरोबरच, बँक, पर्यटन प्रसारमाध्यमे अशा विविध क्षेत्रात हिंदीतून रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, हिंदी ही सर्वांना आवडणारी जिंदादिल भाषा असून, ती प्रत्येकाच्या दिलाची धडकन आहे. ती खऱ्या अर्थाने जनमानसाची भाषा असून, हिंदीच्या विकासासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत असेही ते म्हणाले.




यावेळी हिंदी विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मप्रयासफ आणि क्रीडा विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या म ध्यानचंदफ या भित्तीपत्रकांचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ऐश्वर्या बोडके, शिवकन्या सुरनर आणि वैष्णवी मंडले या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ. नागराज मुळे यांनी केले, तर डॉ. पांडुरंग चिलगर यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीमती शोभा शेळके यांचे कार्य गौरवशाली

ठासून भरले जिच्या ठाई वात्सल्य,अशा सत्कारमुर्तीचे गुण गाणे हेच आहे माझ्या जीवनाचे साफल्य, जिवनाचे साफल्य....

दिनांक २ ऑगस्ट १९६६ रोजी तळेगाव येथे शेतकरी कुटुंबात हे कन्यारत्न जन्माला आले. अत्यंत हालाखिची परिस्थिती, प्राथमिक शिक्षाा गावातीलच शाळेत पूर्ण केले. माध्यमिक शिक्षण अहमदपूर उच्च माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी कॉलेज येथे १९८४ ला पूर्ण केले. डी. एड. रमामाता शाळेवर अध्यापिका विद्यालय औराद शहाजानी येथे १९८६ रोजी पूर्ण केले. बी.ए. १९९१, एम.ए. १९१८, बी.एड. २०२१, डीएसएम २०१२ इत्यादी शिक्षण त्यांनी बिकट आणि खडतर परिस्थीतीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. बालपणीच आईचे छत्र हरवले व त्यांना मायेच्या पोरखेपणाला सामोरे जावे लागले. मुलीच्या जिवनात आई अत्यंत महत्त्वाची असते परंतु इथूनच त्यांचा संघर्ष प्रवास सुरु झाला. त्यातच नंतर वडीलांचाही अॅक्सीडेंट झाला आणि एवढ्याश्या वयात मोठी जबाबदारी अंगावर पडली. नंतर लग्न झाले व शेतीत कामासाठी जावे लागे. अशातच तूरीची फवारणी सुर होती. डोक्यावर पाण्याची घागर पतीच्या पाठीवर फवारा, अंग चिखलाने माखलेले, घामाने भिजलेले, कामामुळे हाताला फोड आलेले व याच काळात आनंदाचा दिवस उजाडला व १९८७ साली निवड मंडळा तर्फे नोकरीची ऑर्डर आली. आनंद गगणात मावेनासा झाला. तळेगाव येथे नोकरीस सुरुवात केली. त्यावेळी इमारत नव्हती, शेणामातीने माखून वडीलांनी दिलेल्या वाड्यात शाळा भरवली. रात्रीही मोफत शिकवणी सुरु केली. तळेगाव येथे सध्या उभी असलेली दिमाखदार इमारत उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. अनेक उपक्रम शाळेत राबविले गेले जसे गीत मंच, सहल क्षेत्रभेट, त्याचसोबतच संसाराचा गाडा सुरुच होता. संकटे काही साथ सोडत नव्हती. एकापाठोपाठ तीन मुलीच झाल्याने सासरची मंडळी नाराज होऊन वनवासात वाढच होऊ लागली पण हार मानली नाही. पुढे पुन्हा जिवनात आनंदाचा प्रसंग आला मुलगा झाला परंतु सतत दवाखाना करावा लागला. घरून शाळेत आले की, घरचे सर्व दुःख या निरागस बालकात विसरुन जायचे व त्यांच्या समस्या अडचणी सोडवण्याचे बळ आपसूकच येत गेले. कुटुंब, लेकरे, घर, शाळा, करत-करत दिवस सरत होते. त्यातच लेकरं मोठे होत गेली. मुलींच लग्न, मुलांचे शिक्षण,



नोकरीतील बदली हा प्रवास करता करता एक दिवस अचानक पतींना पॅरालिसिस अॅटेक आला. त्यांचा दवाखाना जवळ होती नव्हती जमापुंजी खर्चूनही हाती यश आले नाही. ते अंथरुणाला खिळले. पुन्हा सर्वच बाजून कोलमडून पडले तरीही धीर सोडला नाही.

प्रत्येकानेच टिपल्या होत्या
तिच्या झालेल्या चूका
परंतू कोणालाच दिसल्या नाहीत
तिच्या अंतरमनातील व्यथा

अशाही परिस्थितीत न जाणे कोण ते जगण्याचे बळ देत होते त्यातच मुलाचेही आजरपण आले. काय करणार हा एकखांबी तंबू, कधीतरी चार मायेच्या शब्दांचा आधार देणाऱ्या पित्यालाही नियतीने हिरावून घेतले. सगळीकडूनच दुःखाचा डोंगर असतानाही सकारात्मक दृष्टीकोण व प्रचंड हिंमतीच्या जोरावर स्वतःच स्वतःला समजावत गेले. कधी तरी काळ बदलेल असे सांगून स्वतः ला घडवत गेले. त्यातच पतीच्या मेंदूचा ताबा सुटला, अवघड परिस्थिती अशातच नळेगावला बदली. अशा अवस्थेतही १३ वर्षे पतीचे आजारपण, मुलांचे शिक्षण, लग्न, जबाबदाऱ्या पार पाडत पाडत स्वतःचही शिक्षण पूर्ण केले. परंतू कधीही याचा शाळेतील मुलांच्या मनोबलावर परिणाम होवू दिला नाही. इंग्रजी विषयाचे प्रभावी अध्यापन केले. साधनव्यक्ती म्हणून आदर्श कार्य विविध उपक्रम राबवून विद्यार्थी डॉक्टर. इंजिनिअर, वकील. आर्मी, नेव्हीमध्ये सर्वच क्षेत्रात कार्यरत आहेत.

नोकरी केलेली गावांमध्ये तळेगाव. लांजी, सताळा, काळेगा, कुमठा, चाकूर, नळेगाव पुन्हा लांजी व सध्या नांदूरा- चिखली केंद्राची केंद्रप्रमुख म्हणून नियुक्त. अनेक उपकृम राबवले जसे - लेझीम पथक, विद्यार्थी प्रिय शिक्षीका म्हणून नेहमीच गौरव, बालआनंद मेळावा, सहली, ढोल पथक, झांझ पथक, अनेक कला, क्रीडा, सांस्कृतीक उपकृम, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, वृक्षारोपन, महीला मेळावे, ज्यादा क्लास, गावासाठी कार्य, शैक्षणीक, सामाजिक, राष्ट्रीय कार्यात हिरिरीने सहभाग, बचत बँक, पोलरिबन, घुंगरुकाळी, पथक निर्मिती, सेवेच्या काळात विद्यार्थ्यांचे पालकांचे, शिक्षणप्रेमींचे प्रचंड आदराची वागणूक व जिव्हाळा लाभला. या कार्याची दखल घेत विविध पुरस्कार प्राप्त झाले. त्यात १. तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार, २. कला, क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य धनादेश, ३. साक्षरता अभियान पुरस्कार, ४. हिरकणी पुरस्कर, ५. नारीरत्न पुरस्कार, ६. शिक्षक संघटना जिल्हा पुरस्कार, ७. शासनाचा जिल्हास्तरीय पुरस्कार इत्यादी अनेक पुरस्कार प्राप्त झाले. ७ मार्च २०२४ रोजी नांदूरा, चिखली केंद्राच्या केंद्रप्रमुख म्हणून अतिशय उत्तम व उल्लेखनिय कार्य त्यांनी केले आहे. म्हणून मला म्हणावेसे वाटते -

घेतली तिने आकाश भरारी
चंद्रावर पाऊल पडलं होतं
आली घेऊन गगन भरारी
कौतूक सर्वांनाच वाटल होतं...



लेखनप्रपंच
**कामाक्षी कल्याणराव पवार**
विषय साधनव्यक्ती
गट साधन केंद्र, अहमदपूर
मो.नं. ९४२०४३४७८८

**दैनिक यशवंत नियमित वाचा**

## कबीरवाणी

**बोली एक अनमोल है,**
**जो कोई बोलै जानि।**
**हिये तराजू तौलि के,**
**तब मुख बाहर आनि॥**

**भावार्थः** संत कबीर सांगतात की, बोली म्हणजेच आपली वाणी ही खुप अनमोल आहे. वाणी चा प्रयोग जो कोणी चांगल्या प्रकारे करतो तोच तिचे महत्त्व जाणु शकतो. म्हणुन वाणी म्हणजे एक अमुल्य रत्न आहे. म्हणुन मानवाने वाणीचा, बोलीचा उपयोग करत असताना प्रत्येक शब्द ह्दयाच्या तराजुमध्ये तोलुनच तोंडातुन शब्द बाहेर काढला पाहिजे. जो मनुष्य वाणीचे महत्व जाणतो तो आपल्या तोंडुन कधीच वाईट शब्द बाहेर काढत नाही. प्रत्येक शब्द तोलुन त्याचा मोल करुनच तो बोलत असतो. म्हणुन बोली, वाणी ही अनमोल आहे, तिचा उपयोग करत असताना खुप विचारपुर्वक उपयोग करावयास हवा(तोल मोल के बोल) असा सल्ला संत कबीर या दोह्या मधुन देतात.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर गोविंदराव**
मो. ९८२३११२९०७

यशवंत
धाराशिव जिल्हा
रविवार दि. १५ सप्टेंबर २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

## योजनांच्या जागृतीतून महिलांचे सशक्तीकरण

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – केंद्र, राज्य शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील परंडा येथे कोटला मैदानावर विविध शासकीय विभागांची दालने एकाच छताखाली उभारण्यात आली. दालनाच्या माध्यमातून अनेक योजनांची माहिती नागरिकांनी या ठिकाणी जाणून घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या दालनांमधून महिला व बालविकास, शिक्षण, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, जल जीवन मिशन आदी विभागाच्या विविध योजना, उपक्रमांची माहिती संबंधित नागरिकांना अधिकारी, कर्मचारी यांनी दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, मुलींना मोफत उच्च शिक्षण, पोषण अभियान, पूरक पोषण आहार, लेक लाडकी आदी योजनांसह विविध योजनांची दालनांमध्ये माहिती देऊन नागरिकांमध्ये योजनांबाबत जागृती करण्यात आली. महिला आर्थिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांच्याकडून नमो महिला सशक्तीकरण अभियान, गट निर्मिती, फिरता निधी, अर्थसहाय्य, प्रशिक्षण आदींबाबत माहिती देण्यात आली. जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने महिलांना उद्योग उभारणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तर माझी शाळा सुंदर शाळा, माझी शाळा माझी परस बाग, आनंददायी शिक्षण, आकांक्षित तालुका असलेल्या परंडा तालुक्याबाबत शिक्षण विभागाच्यावतीने ठरवलेल्या उद्दिष्टांची जागृतीही या ठिकाणी प्रात्यक्षिकांसह करण्यात आली.

# बहिणींच्या डोळ्यातील आनंद सांगतो, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुपरहिट – मुख्यमंत्री शिंदे

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह सर्व योजना सुरूच राहणार

## कांद्यावरील निर्यात शुल्क रद्द केल्याबद्दल केंद्र शासनाचे आभार






## लाडक्या बहिणींना ३० सप्टेंबरपर्यंत नाव नोंदविता येणार

**प्रास्ताविकामध्ये पालकमंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत गेल्या दोन वर्षात नागरिकांना पुरविण्यात आलेल्या आरोग्य सुविधांचा लेखाजोखा मांडला. गतवर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे वारकऱ्यांना पुरविलेल्या आरोग्य सुविधांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने नोंद घेतली आहे. याशिवाय आरोग्य विभागाने राबविलेल्या माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित आणि जागरूक पालक सुरक्षित बालक या अभियानांमुळे राज्यातील मातामृत्यू व बालमृत्यू दर कमी करण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राज्यातील १२ कोटी ६५ लाखापेक्षा अधिक नागरिकांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेतून ५ लाख रुपयांचे आरोग्य विमा कवच दिले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबवून जवळपास साडेअकरा हजार युवक-युवतींना नोकरी दिली आहे. बदली प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी पहिल्यांदाच ऑनलाईन प्रणाली विकसित केली असून याद्वारे अधिकारी, कर्मचारी यांच्या बदल्यांची कार्यवाही केल्याचे डॉ. सावंत म्हणाले.**

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – मला मुख्यमंत्री पदापेक्षा भाऊ हा शब्द जिव्हाळ्याचा वाटतो. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाच्या आजच्या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने सहभागी झालेल्या लाडक्या बहिणींच्या डोळ्यातील आनंद पाहून मनाला अतिशय समाधान मिळत आहे. त्यांच्या डोळ्यातील हा आनंद म्हणजे या योजनेच्या यशस्वीतेची पावती आहे. ही योजना 'सुपरहिट' ठरल्याचे यातून स्पष्ट होत असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दि.१४ सप्टेंबर रोजी व्यक्त केली. परंडा येथील कोटला मैदानावर आयोजित महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत, आमदार ज्ञानराज चौगुले, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष,जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव, प्रा. शिवाजी सावंत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केल्यानंतर अनेकांनी याविषयी शंका उपस्थित केल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.शिंदे पुढे म्हणाले,महिला सक्षम तर देश सक्षम हे ब्रीद लक्षात घेवून राज्य शासनाने ही योजना प्रभावीपणे राबविली. या योजनेतून लाडक्या बहिणींच्या खात्यावर रक्कम जमा झाली असून त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, त्यांच्याकडून मिळणारे प्रेम पाहिल्यानंतर मनाला समाधान मिळत आहे.लाडक्या



बहिणींच्या चेहऱ्यावरील आनंद असाच कायम ठेवण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह राज्य शासनाच्या इतरही योजना यापुढेही सुरु राहतील. लाडक्या बहिणींची साथ देणारा हा एकनाथ आहे असे सांगून या योजनांसाठी निधीची तरतूदही शासनाने केली असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.तसेच भविष्यात या योजनेचा लाभ टप्प्या-टप्प्याने वाढविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे मला गरिबीची जाणीव आहे. गरीब कुटुंबातील महिलांच्या दृष्टीने दीड हजार रुपयांचे मूल्य खूप मोठे आहे, हे अनेकांना माहित नाही.नुकतेच माझी भेट झाल्यानंतर प्रणाली बारड या बहिणीने मला सांगितले की, दीड हजार रुपयातून तिने घुंगरू कडीचा व्यवसाय सुरु केला. गौरी गणपतीच्या सणात तिला या व्यवसायातून दहा हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले. याच प्रकारे इतरही भगिनींनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून मिळालेले पैसे आपापल्या परीने विविध व्यवसायात गुंतविले आहे. त्यातून त्यांच्या व्यवसायाला आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. महिलांसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिल्यानंतर तोट्यातील एसटी महामंडळ नफ्यात आले. त्याचप्रमाणे आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळेही राज्य शासनाच्या अर्थव्यवस्थेला नुकसान न होता चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून महिलांना एका वर्षात तीन घरगुती गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय घेवून त्यांच्या शिक्षणाला पाठबळ दिले आहे. मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षांपर्यंत तिच्या बँक खात्यात टप्प्या-टप्प्याने एक लाख रुपये जमा करण्यासाठी लेक लाडकी योजना सुरु केली आहे. लाडक्या बहिणींसोबत लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करून त्यांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. या प्रशिक्षणार्थींना राज्य शासन दरमहा सहा ते दहा हजार रुपये विद्यावेतन देणार आहे. अशी योजना राबविणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य असल्याचे त्यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध

शेतकऱ्यांसाठीही राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेतून साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी सन्मान योजना सुरु करून देशात पहिल्यांदाच राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर दरवर्षी सहा हजार रुपये जमा करण्याचा निर्णय घेतला आहे.यासोबतच शेतकऱ्यांना केवळ एक रुपये विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ दिला असून शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री शिंदे त्यांनी नमूद केले. तसेच केंद्र शासनाने कांद्यावरील किमान निर्यात शुल्क रद्द करण्याचा आणि खाद्यतेलावर आयात शुल्क वाढविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना चांगला दर मिळण्यास मदत होणार असल्याने त्यांनी केंद्र शासनाचे आभार मानले.

उजनी धरणातून सीना-कोळेगाव प्रकल्पात पाणी आणण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी येत्या पंधरा दिवसात बैठक घेणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले. पालकमंत्री डॉ. सावंत यांनी या प्रकल्पाचे ९८ टक्के काम पूर्ण झाले असून गेल्या तीस वर्षांपासून प्रतीक्षा असलेला हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी लक्ष घालण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना केली होती. परंडा येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसह इतर योजनांच्या महिला लाभार्थ्यांना यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात धनादेश आणि निवड पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी



पारंपारिक वेशभूषेत आलेल्या सिंधू पवार आणि पूजा पवार या बंजारा समाजातील भगिनींनी मुख्यमंत्र्यांना राखी बांधली.

प्रारंभी लाडक्या बहिणींचे स्वागत स्वीकारत मुख्यमंत्री शिंदे यांनी कार्यक्रमस्थळी प्रवेश केला. यावेळी अनेक बहिणींनी त्यांना राखी बांधली. तसेच काही महिलांनी त्यांच्यासोबत मोबाईलवर सेल्फी घेण्याचा आग्रह केला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्वतः महिलांच्या मोबाईलमध्ये सेल्फी काढून देत आपल्या लाडक्या बहिणींचा मान राखला. मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि पालकमंत्री डॉ. सावंत यांनी लाडक्या बहिणींवर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत केले. श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा आणि कवड्याची माळ, श्री विठ्ठल मूर्ती, वीणा व घोंगडी देवून यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांना मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन ऐश्वर्या हिबारे आणि निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी केले. आभार जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी मानले. कार्यक्रमाला महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत अनेकांनी केला पक्ष प्रवेश





धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) – महाराष्ट्राच्या कुलस्वामिनीच्या पावन भूमीतून मुख्यमंत्र्यांनी विधानसभेच्या निवडणुकीचे बिगूल शिवसेना पक्ष कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात फुंकले. या शिवसेना पक्ष मेळाव्यासाठी मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले शिवसेना पक्षाचे प्रमुख तथा मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे स्वागत शिवसेना जिल्हा संघटक सुधीर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रथम हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, शिवसेना प्रमुख हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी, आमदार ज्ञानराज चौगुले, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज सांळुखे, जिल्हा संपर्कप्रमुख अनिल खोचरे, आनंद पाटील, अमर कदम परमेश्वर, आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री लाडकी बहिणीच्या लाभार्थी असलेल्या बहिणीकडून व प्रेमाताई सुधीर पाटील,सौ. सुषमा देशमुख ,सौ. डॉ.मंजुळा आदित्य पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे औक्षण केले. यावेळी १९० शिवसेना शाखेच्या फलकांचे अनावरण व शेकडो युवकांचा शिवसेना पक्ष प्रवेश मुख्यमंत्र्यांचे उपस्थितीत केला. मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक भास्करराव सां. नायगांवकार, बुबासाहेब उर्फ यशवंत माधवराव जाधव, शेषराज बनसोडे, गोविंद नलावडे यांचा सत्कार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हा शिवसेना संघटक सुधीर पाटील यांच्या नेतृत्वाखाली या मेळाव्याचे आयोजन हातलाई मंगल कार्यालय धाराशिव येथे करण्यात आले होते. या मेळाव्यात शिवसेनेच्या पदाधिकारी व शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र शासनाच्या अनेक लोककल्याणकारी योजना सरकार सामान्यांसाठी, गरिबांसाठी राबवत असून लोकांना यांचा लाभ मिळत असून जास्तीत जास्त संख्येने या योजनांचा लाभ घ्यावा. तसेच या योजना लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम शिवसैनिकांनी योजना दूत म्हणून करावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेमुळे लाखो बहिणींच्या खात्यावर रक्कम आज प्रत्येक महिन्याला पडत आहे. त्यामुळे विरोधकांचे पोटशूळ उठत असल्याचा जबरदस्त पलटवार त्यांनी केला. या मेळाव्यास जिल्हाभरातून हजारो शिवसैनिक व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थी महिला व युवानेते अभिराम पाटील, निखील कांदे-पाटील तसेच जिल्हातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप जगताप यांनी तर आभार आदित्य सुधीर पाटील यांनी मानले.

# ४५ हजार कोटींच्या पॅकेजचे झाले तरी काय?

## मराठवाडा जनता विकास परिषदेचा मुख्यमंत्र्यांना खडा सवाल

लातूर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गतवर्षी मोठा गाजावाजा करीत मराठवाडयासाठी जाहीर केलेल्या ४५ हजार कोटींच्या पॅकेजचे नेमके झाले तरी काय असा खडा सवाल करीत, यंदा छत्रपती संभाजीनगर मध्ये मंत्रिमंडळाची बैठक न घेतल्याबद्दल राज्य सरकारचा जाहीर निषेध मराठवाडा जनता विकास परिषदेच्या लातूर महानगर शाखेने केला.

या संदर्भात मुख्यमंत्र्यांना शुक्रवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदनही देण्यात आले असून, त्यात लातूर जिल्हावासियांच्या जिव्हाळ्याच्या असलेले अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्याची मागणी केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात या संबंधीचे निवेदन देणार्या शिष्टमंडळात मजविपचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व अभ्यासगट प्रमुख ॲड. भारत साबदे, परिषदेच्या लातूर महानगर शाखेचे अध्यक्ष जयप्रकाश दगडे, अभ्यास गट सदस्य महेंद्र जोशी यांचा समावेश होता.

उजनीचे पाणी धाराशिवपर्यंत येऊ शकते. परंतु लातूरला उजनीचे पाणी आणण्याची राजकीय इच्छाशक्ती कोणाचीही नाही. या शहरासाठी उजनी वा अन्य कोणत्याही प्रकल्पातून कायमस्वरुपी पाणीपुरवठा करावा, अशी मागणी मजविपने निवेदनाद्वारे केली असून, जिल्हा रुग्णालयासाठी कृषी विद्यापीठाची दहा एकर जागा खरेदी करण्याकरिता मंजूर केलेला ३ कोटी ३३ लाखांचा निधी तातडीने उपलब्ध करावा, या मागणीचाही निवेदनात समावेश आहे. उदगीर येथील शासकीय दूध डेअरी व दूध भुकटी प्रकल्प भंगारात न काढता त्वरित पूर्ववत् सुरु करावा, लातूर- मुरुड- टेंभुर्णी महामार्गाचे काम तातडीने सुरु करावे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या लातूर उपकेंद्रास विद्यापीठाचा दर्जा द्यावा, अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना ताबडतोब नुकसान भरपाई देण्यात यावी, शेतीमालाला हमीभाव मिळण्यासाठी कायदा करावा, लातूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करावे, सर्वच सरकारी क्षेत्रांतील रिक्त जागा त्वरित भरण्यात याव्यात, नळेगाव येथील बंद असलेला जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना त्लरित सुरु करावा, औसा तालुक्यातील टेंभी सिंदाळा येथे शासनाने खरेदी केलेल्या व सध्या पडून असलेल्या सहाशे एकर जमिनीवर ताबडतोब सौर ऊर्जा प्रकल्प सुरु करावा, चाकूर- अहमदपूर येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरु करण्यास मान्यता द्यावी, शून्य ते वीस विद्यार्थीसंख्या असलेल्या शाळांवर सेवानिवृत्त शिक्षक न नेमता नियमित शिक्षक भरती करुन बेरोजगारीचा प्रश्न सोडवावा, निलंगा- रेणापूर येथे एमआयडीसी सुरु करुन रेणापूर येथे शेतीमालावर प्रक्रिया करणारा उद्योग सुरु करावा, आदी महत्वाच्या मागण्या मराठवाडा जनता विकास परिषदेच्या लातूर महानगर शाखेने केल्या आहेत.

# गंजगोलाईतील दुकान मालकांनी केलेले अतिक्रमण काढावे जनहित युवा संघटनेने मनपा आयुक्तांना दिले निवेदन



लातूर प्रतिनिधी,- लातूर येथील नावाजलेल्या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या विविधतेने नटलेल्या १६ रस्त्यांना जोडणारा प्रसिद्ध बाजारपेठ म्हणजे गंजगोलाई या सर्व विविध १६ रस्त्यांना जोडणारे रोड मेन रोड, कापड लाईन, भुसार लाईन, चुरमुरे मसाला लाईन, मस्जिद रोड, भाजी मार्केट, नांदेड रोड, नावंदर मार्ग, नवयुग टाकी मार्ग, शिवाजी महाराज मार्ग, सोनार लाईन, लोखंड लाईन मार्गावरील व्यापारी दुकानदाराने दुकाना व्यतिरिक्त समोर फुटपाथवर, रोडवर व्यापाऱ्यांनी टेबल व इतर साहित्य ठेऊन केलेल्या अतिक्रमणामुळे ग्राहकांना, महिला, नागरिकांना, पादचाऱ्यांना, वाहन चालकांना रहदारी करतांना मोठी कसरत करावी लागत असून जाण्यासाठी मज्जाव करीत अतिक्रमण करून अर्धा रोड चक्क दुकानदारीने बंद करून रहदारीस अडथळा निर्माण करीत आहेत यामुळे नागरिकांना अपघातांना सामोरे जावे लागत असल्याने आज शुक्रवार दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरेसह सी झोन क्षेत्रीय अधिकारी पवन सुरवसे यांना दुकानासमोरील रोडवर केलेल्या रस्त्यावर जाण्या येण्यासाठी अडथळा निर्माण होत असलेले अतिक्रमण तात्काळ काढावे व गंजगोलाईतील रस्त्यांनाही मोकळा श्वास द्यावा म्हणून जनहित युवा संघटनेने आज निवेदन देत आयुक्तांशी चर्चा केली. याप्रसंगी जनहित युवा संघटनेने दिलेल्या निवेदनावर अतिक्रमण तात्काळ न हटवल्यास येणाऱ्या पुढील काळात लोकशाही पद्धतीने मोठे आंदोलन करणार असल्याचेही यावेळी आयुक्तांशी चर्चा करताना सांगितले. यावेळी जनहित युवा संघटना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जनहित युवा संघटना महाराष्ट्र राज्य मराठवाडा अध्यक्ष दीपक गंगणे, सामाजिक कार्यकर्ते हातिम भाई शेख,नितीन चालक आदींसह इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हास्तरीय व विभागीय स्पर्धेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे यश

लातूर : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,लातूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या म.न.पा. अंतर्गत विविध स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी जिल्हा स्तरावर सर्वप्रथम आले व विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले.यामध्ये चि.प्रद्युम्न देशपांडे यांनी रायफल शूटिंग स्पर्धेत तसेच साईनाथ धाकपाडे यांनी कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला.धैर्यशील कातळे यांनी बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम ,कुमारी देशपांडे गौरी बुद्धिबळ स्पर्धेत चतुर्थ क्रमांक,सुयश शेटे याने उशू स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला.प्रणिश आयाचित या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय टेबल टेनिस निवड चाचणीसाठी पात्र,जिम्नॅस्टिक स्पर्धेत ऋतुराज नाईक यांनी जिल्हास्तर व विभाग स्तरावर प्रथम क्रमांक येऊन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झालेला आहे.या यशस्वी सर्व खेळाडूंना डॉ.महेश बेंबडे,प्रा. निशिकांत सदाफुले,प्रा.विनोद गौरे यांचे मार्गदर्शन लाभले.

सदरील स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,प्रा.भालचंद्र कोयलवार,प्रा.विजयकुमार मांदळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# गणेशोत्सवाच्या माध्यमातून प्रबोधन आणि संस्कार होण्याची आवश्यकता: व्यंकटराव पनाळे

लातूर / प्रतिनिधी – गणेशोत्सवाची सुरुवात ही समाजजागृती आणि लोकप्रबोधन करण्याच्या उद्देशाने झालेली आहे. आज सुद्धा या गणेशोत्सवाच्या माध्यमातूनच समाज प्रबोधन आणि संस्कार होण्याची अत्यंत गरज असल्याचे विचार लोकाधिकारप्रमुख व्यंकटराव पनाळे यांनी याप्रसंगी बोलताना मांडले.

दिनांक १२ सप्टेंबर २०२४ वार गुरुवार रोजी रात्री ८ वाजता हरंगुळ (बु.) येथील सार्वजनिक श्री. गणेश मंदिर, विठ्ठल नगर येथे विठ्ठल साई मित्र मंडळाच्या वतीने प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या गणरायाची आरती लोकाधिकारप्रमुख मा. श्री. व्यंकटराव पनाळे यांच्या हस्ते करण्यात आली.

आरती झाल्यानंतर उपस्थित सर्वांना लोकाधिकारप्रमुख मा. श्री. व्यंकटराव पनाळे यांनी गणेशोत्सवाचे महत्व आणि हिंदू समाजाने घ्यावयाची काळजी या विषयावर प्रबोधन केले. गणेश मंडळाच्या वतीने मा. श्री. व्यंकटराव पनाळे आणि संतोष पनाळे यांचा शाल, पुष्पहार, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गणेश मंडळाचे नामदेवराव पोफळे, हणमंतराव कदम, अनिलराव जाधव, शंकरराव पवार, अशोकराव कळसे, अंकुश कोल्हापुरे, प्रदीपकुमार बिडवे, अजय काळसे, गजानन कुलकर्णी, शैलेश पवार, आदित्य काळसे, ईश्वर पोफळे, संस्कार पवार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विठ्ठल नगर परिसरातील माता-भगिनी, युवक, बाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आत्मबोध १४

करू चित्ताची प्रसन्नता ।
दु:ख नाश होई सर्वथा ।
हीच अपेक्षा आता ।
सर्वांनाच ।। १ ।।

प्रसन्नतेने मिळे धीर ।
बुद्धी होते स्थिर ।
आत्मस्वरूपी वीर ।
तोच आहे ।। २ ।।

जो आहे प्रसन्न ।
दु:खही तेथे खिन्न ।
मिळे आम्हा ज्ञान ।
तिथे सर्व ।। ३ ।।

आता राहू प्रसन्न ।
घेऊ सात्विक अन्न ।
मग निश्चिंत मन ।
निश्चित राहे ।। ४ ।।

सिद्धदास, सोलापूर
२९/०१/२०२२



# ॲड. बळवंत जाधव यांना पुरस्कारार्थींचे निवेदन

लातूर / प्रतिनिधी- महाराष्ट्र शासनाच्या वतीने सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार दिले जातात. या पुरस्कारार्थींनीची दि. १२/०९/२०२४ रोजी लातूर येथील ॲड. बळवंत जाधव जिल्हा संपर्क प्रमुख शिवसेना यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

सदरील पुरस्कारार्थींना दरमहा शासनाच्या वतीने मानधन दिले जावे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसेसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा असावी, शासनाच्या विविध तालुका, जिल्हा राज्य, समित्यावर नियुक्ती व्हावी. रेल्वे प्रवासात मोफत प्रवासाची सुविधा मिळावी अशा अनेक विविध मागण्यांचे निवेदन शिष्ट मंडळाने त्यांना दिले. निवेदनाचा स्विकार केल्यानंतर ॲड. बळवंत जाधव यांनी पुरस्कारार्थींना आपल्या मागण्या न्याय आहेत. मी आपल्या मागण्या सन्माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यापर्यंत पोहचवतो व त्या पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करतो असे आश्वासन दिले. यावेळी शिष्ट मंडळात श्रीहरी कांबळे, शेषेराव करखेलीकर, रमेश जोंधळे, व्ही.एस. गायकवाड, गोपाळ गोतावळे, तुकाराम देवणीकर, केशव कांबळे, ॲड. जयराज जाधव, संपतराव तिकटे, लक्ष्मण तिकटे, नागनाथ कांबळे, ॲड. अंगद गायकवाड, प्रकाश धादगिने इत्यादी विविध भागातून आलेल्या पुरकारार्थींची उपस्थिती होती.

### मुकुंद शिनगारे यांचे निधन

येरोळ : बरदापुर ता.अंबाजोगाई



येथील ह.भ.प. मुकुंद निवृत्ती शिनगारे महाराज वय १०० यांचे शनीवारी पहाटे वृध्दपकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्र्चात एक विवाहीत मुलगा पाच मुली सुन नातवंडे असा परिवार असुन त्यांच्या पार्थिवावर शनीवारी सायकाळी चार वाजता त्यांच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. येरोळ येथील संजय गांधी निराधार योजनेच्या सदस्या सौ. आशा प्रभाकर पालकर यांचे ते वडील होत.

# १५ सप्टेंबर रोजी शिर्डी येथील पेन्शन राज्य अधिवेशनात प्राध्यापकांनी सहभागी व्हावे

लातूर / प्रतिनिधी- महाराष्ट्रातील सर्व कर्मचार्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना व कर्मचारी समन्वय समितीने दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी शिर्डी, जि. अहमदनगर येथे पेन्शन राज्य अधिवेशन आयोजित केले आहे. या अधिवेशनात प्राध्यापकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने १ नोव्हेंबर २००५ रोजी व नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना डीसीपीएस/ एनपीएस योजनाफ सुरू केली. त्यानंतर केंद्र व राज्य सरकारने २४ व २५ सप्टेंबर २०२४ रोजी अनुक्रमे एकीकृत निवृत्तीवेतन योजना (U.P.S.) व सुधारित पेन्शन योजना लागू करण्याची घोषणा केली आहे. या सर्व पेन्शन योजनांचे स्वरूप बघता या योजना निव्वळ फसव्या असून त्यातून सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांना सामाजिक व आर्थिक स्थैर्य मिळणे कठीण आहे.

त्यामुळे १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना म.ना.से. अधि. १९८२ व १९८४ अंतर्गत जुनीच पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी अशी मागणी राज्यातील १७ लाख कर्मचाऱ्यांच्यावतीने सातत्याने विविध आंदोलने, मोर्चे, उपोषणे आदि माध्यमातून केली जात आहे.

नवीन पेन्शन योजनेतील राज्यातील जवळपास ८ लाख २७ हजार कर्मचाऱ्यांचा सुधारित पेन्शन योजनांना विरोध असून केवळ जुनी पेन्शन योजनाच कर्मचाऱ्यांच्या हिताची आहे हे राज्य शासनाला ठणकावून सांगण्यासाठी दि १५ सप्टेंबर २०२४ रोजी संत जनार्दन स्वामी आश्रम शेजारी, शिर्डी जि. अहमदनगर येथे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या पुढाकारातून पेन्शन महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.

राज्य पातळीवर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफुक्टो) व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत एमफुक्टो संलग्नित स्वामुक्टा प्राध्यापक संघटनेच्यावतीने या राज्यस्तरीय पेन्शन अधिवेशनाला जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. स्वामुक्टा चे सर्व पदाधिकारी व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने या पेन्शन अधिवेशनात सक्रीयपणे सहभागी व्हावे असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड, सचिव डॉ. विजय भोपाळे, कोषाध्यक्ष डॉ. दिलीप पाईकराव, उपाध्यक्ष डॉ. डी. एन. मोरे, समन्वयक डॉ.अमोल लाटे व केंद्रीय कार्यकारिणी पदाधिकारी डॉ. गोपाळ मोघे, डॉ. टी.आर. फिसफिसे, डॉ. सुनील व्हावारे, डॉ. करुणा देशमुख, प्रा. डी. आर.भुरे, डॉ. गौतम दुथडे, डॉ. सुधीर वाघ, डॉ. किशोर हुगे, डॉ. जयद्रथ जाधव, डॉ. रामचंद्र भिसे, डॉ. नानासाहेब पाटील, डॉ. काशिनाथ चव्हाण, डॉ. प्रभाकर जाधव,डॉ.संजीव अग्रवाल, डॉ. मनोजकुमार सोमवंशी, डॉ. रावसाहेब इंगळे, डॉ. बाळासाहेब गित्ते, डॉ. एस.आर. यादव यांनी केले आहे.

# लाहोटी स्कूलमध्ये श्यामसुंदर भार्गव यांना श्रद्धांजली




लातूर / प्रतिनिधी- श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे माजी सचिव श्यामसुंदर भार्गव यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले आहे. श्यामसुंदर भार्गव गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होते. मृत्युसमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाबद्दल राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये शोक व्यक्त करत शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सामुहिक श्रद्धांजली अर्पण केली.

शोक सभेत बोलताना स्कूलचे रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर म्हणाले की नैतिकता, मूल्ये, शिस्तीचे समानार्थी शब्द म्हणजे श्यामसुंदरजी भार्गव, ज्यांना भाऊ म्हणून ओळखले जाते, त्यांनी संस्थेच्या सर्व क्षेत्रांत वाढ करण्यात नेहमीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. संस्थेच्या शाळांमधील गुणवत्ता वाढविण्यावर त्यांनी दृढ लक्ष केंद्रित केल्याने आमच्या प्रशिक्षण आणि मानव संसाधन क्षमतांमध्ये मोठी भर पडली.

शाळेतील सर्व कॅडरमध्ये नेतृत्व विकसित करण्याच्या त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीमुळे परिणामाभिमुख मानव संसाधने निर्माण झाली आहेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी केवळ व्यवस्थाच विकसित केली नाही तर संस्थेमध्ये मूल्यावर आधारित कार्यसंस्कृतीही प्रस्थापित केली. आपल्या संवादातून, संबोधनातून त्यांनी नेहमीच संस्थेचे संस्थापक सेठ पुरणमलजी लाहोटी यांचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थी, कर्मचारी यांच्यामध्ये समृद्ध मूल्ये आणि स्वयंसेवीपणा आत्मसात करण्यात त्यांचे विलक्षण योगदान आहे. विद्यार्थिनींना मदतीचा हात देण्यासाठी त्यांनी गोदावरीच्या लेकी उपक्रमाची सुरुवात केली.

# हिंदी भाषा रोजगाराभिमुख भाषा: डॉ.साईनाथ उमाटे



लातूर : हिंदी भाषा ही आपल्या मनातल्या सुख-दुःखाच्या भावभावना व विचार प्रकटीकरणाचे समाज व्यवहाराचे प्रभावी असे माध्यम आहे.हिंदी ही जन,मन आणि धनाची भाषा आहे.हिंदी भाषेत ज्ञानाचे प्रचंड असे भांडार आहे.हिंदी ही बॅंकिंग क्षेत्र,सिनेमासृष्टी,मीडिया क्षेत्र, जाहिरात क्षेत्र,भाषांतर,अनुवाद क्षेत्र,लेखन आणि स्पर्धा परीक्षा अशा अनेक क्षेत्रात रोजगार देणारी रोजगाराभिमुख भाषा आहे.ती विविधतेतून राष्ट्रीय एकात्मता व अखंडता साधण्याचे काम करते.अशा या हिंदी भाषेचा आदर व सन्मान सर्वांनी करावा,असे प्रतिपादन दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ.साईनाथ उमाटे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने दि.१४ सप्टेंबर २०२४ रोजी म हिंदी दिवस म साजरा करण्यात आला.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.रामशेट्टी शेटकार असे म्हणाले की,मातृभाषा मराठी,राष्ट्रभाषा हिंदी आणि जागतिक भाषा इंग्रजी या तिन्ही भाषेचे मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.या तिन्ही भाषेतून मनातल्या भावना अभिव्यक्त करता येतात. हिंदी ही विश्व स्तरावरची प्रभावी भाषा म्हणून प्रचंड उभारी देणारी रोजगाराभिमुख भाषा आहे.

प्रास्ताविक डॉ.गजानन बने यांनी केले तर आभार बुशरा शेख या विद्यार्थिनीने मानले.सूत्रसंचालन विशाल मस्के,वैभवी माने व तृप्ती बिराजदार यांनी संयुक्तरित्या केले.प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रज्वल जाजे यांनी करून दिला.याप्रसंगी सुनील राक्षे,हरिओम पाटोळे,राजेसाहेब पांचाळ यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# वडार समाजाच्या विविध मागण्यासाठी ॲड. तुकाराम माने यांचे अमरण उपोषण



लातूर / प्रतिनिधी- : महाराष्ट्रातील वडार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दि. १४ सप्टेंबर २०२४ पासून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर अमरण उपोषण खालील मागण्यासाठी ॲड. तुकाराम माने करीत आहेत.

शासनाने त्वरीत खालील मागण्या मान्य कराव्यात १. कै. मारुती चव्हाण वडार समाज आर्थिक विकास महामंडळाची तात्काळ अमलबजावणी करावी, २. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वडार समाजाच्या १०० विद्यार्थ्यांचे स्वतंत्र्य वस्ती गृह सुरू करावे, ३. रोहिणी अयोगाच्या केंद्र शासनाला केलेल्या शिफारशी अनुसार वडार समाजाला ९ टक्के आरक्षण लागू करावे. ४. जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी १९६१ च्या पुराव्याची अट्ट रद्द करावी.५. नॉन क्रिमीलियरची अट रद्द करावी. ६. वडार वस्ती सुधारण्यासाठी स्वतंत्र्य अर्थिक तरतुद करण्यात यावी. ७. वडार समाजातील मजूर संस्थांना प्राध्यान्याने शासकीय कंत्राटाची कामे देण्याची तरदूद करावी. ८. वडार समाजातील स्पर्धा परिक्षार्थी व तसेच नव उद्योजकांना विशेष आर्थिक साहय्याची तरतुद करण्यात यावी. ९. व्यवसायिक शिक्षणासाठीची राज्य शासनाने बंद केलेली शिष्यवृत्त पुन्हा सुरू करावी. १०. बी.आर. इदाते समितीच्या आव्हालाची अमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदर मागण्या शासनाने त्वरीत मंजूर कराव्यात मागण्या मंजूर होई पर्यंत अमरण उपोषण मागे घेणार नाही. असे प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय – दूरध्वनी – २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक – **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# प्रा. जागीरदार महेमूद अली राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित




**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथील जमहूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे इंग्रजी विषयाचे शिक्षक प्राध्यापक जहागीरदार महेमूद अली यांनी जमहूर उच्च माध्यमिक विद्यालयात उज्वल निकालाची परंपरा कायम राखत सलग वीस वर्षे शंभर टक्के गुणात्मक निकाल देऊन अध्यापनात सातत्याने केलेल्या कार्याची दखल घेत विद्यार्थी प्रिय, शिस्त प्रिय, मेहनती शिक्षकाची दखल घेत महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना (माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग ) द्वारे कॉकसीट महाविद्यालय लातूर येथील कार्यक्रमात राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक आमदार माननीय विक्रम काळे व लातूर लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा संपन्न झाला. याबद्दल त्यांचे अभिनंदन लिबरल एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ. अंजुम कादरी मॅडम यांनी केले व तसेच शब्बीर जरगर, मुजीब खतीब साहेब, अॅड. राऊत , कृष्णा पाटील , सरपंच सुरज गीत्ते, समीर शेख, साबेर पटेल ,अजीम दाईमी, बाबा पटेल, मजीद मोमीन, खादरभाई लाटवाले , राजीव नागरगोजे ,चंदन पाटील नागरगोजे, केदार विठ्ठल , रमाकांत गायकवाड , हमीद बागवान , डॉ. आयुब पठाण, डॉ. सादिक पटेल, डॉ. सुनील बनशेळकीकर, मुजीब ,अन्वर , वाजीद , इसहाक ,रहीम , विलास काकनाळे , मलकमपट्टे , यांनीही त्यांच्या अभिनंदन केले. कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी संघटनेचे नेते नुसरत कादरी अब्बास व त्यांच्या टीमने मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

---

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे.चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५८३/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Harilal S/o Poma Pawar हे दिनांक ०८/०४/२०२४ रोजी At. Jalkotanda Tq.Jalkot Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1. Gangabai W/o. Harilal Pawar , Age75 Relation Wife
2. Anusaya W/o. Babu Rathod , Age51 Relation Daughter
3. Gangabai W/o. Shivaji Rathod , Age 48 Relation Daughter
4. Ganesh S/o. Harilal Pawar , Age 46 Relation Son
5. Laxmibai W/o Maroti Rathod, Age 42 Relation Dagughter
6. Janabai W/o. Keshav Rathod , Age 40 Relation Daughter
7. Balaji S/o. Harilal Pawar , Age 42 Relation Son
8. Venkat S/o. Harilal Pawar , Age 36 Relation Son

यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1. | Gangabai W/o. Harilal Pawar | 75 | Wife |
| 2. | Anusaya W/o. Babu Rathod | 51 | Daugther |
| 3. | Gangabai W/o. Shivaji Rathod | 48 | Daughter |
| 4. | Ganesh S/o. Harilal Pawar | 46 | Son |
| 5. | Laxmibai W/o Maroti Rathod | 42 | Dagughter |
| 6. | Janabai W/o. Keshav Rathod | 40 | Daughter |
| 7. | Balaji S/o. Harilal Pawar | 42 | Son |
| 8. | Venkat S/o. Harilal Pawar | 36 | Son |

अर्जदार यांना Harilal S/o Poma Pawar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Harilal S/o Poma Pawar याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०२/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १०/०९/२०२४

डी.ए.कांबळे, कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

---

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे.चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७१५/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे 1) Shrirang@Rangnath Maroti Wattamwar हे दिनांक २७/०७/२०२४ रोजी At. Madlapur Tq.Udgir Dist.Latur 2) Champavati Shrirang Wattamwar हे दिनांक २७/०७/२०२२ रोजी At. Madlapur Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1. Santosh S/o. Shrirang@ Rangnath Wattamwar Relation- Son
2. Sandeep S/o. Shrirang@ Rangnath Watjamwar Relation- Son

Both R/o. Madlapur, Tq.Udgir, Dist.latur

यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1. | Santosh S/o. Shrirang@ Rangnath Wattamwar | 42 | Son |
| 2. | Sandeep S/o. Shrirang@ Rangnath Wattamwar | 40 | Son |

अर्जदार यांना 1) Shrirang@Rangnath Maroti Wattamwar 2) Champavati Shrirang Wattamwar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू 1) Shrirang@Rangnath Maroti Wattamwar 2) Champavati Shrirang Wattamwar याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०४/११/२०२४

डी.ए.कांबळे, कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

---

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय*

(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१०/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्या अर्थी अर्जदार भाग्यश्री संग्राम तोंडारे रा.श्रीकृष्ण कॉलनी निडेबन यांचा जन्म दिनांक ११/०७/१९८९ रोजी मौजे देऊळवाडी ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार भाग्यश्री संग्राम तोंडारे रा. श्रीकृष्ण कॉलनी निडेबन यांनी त्यांचा जन्म दिनांक ११/०७/१९८९ ची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०९/०९/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ११/०७/१९८९ रोजी मौजे देऊळवाडी ता.उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार भाग्यश्री संग्राम तोंडारे रा. श्रीकृष्ण कॉलनी निडेबन यांचा जन्म दिनांक ११/०७/१९८९ रोजीची नाँद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय देऊळवाडी ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १०/०९/२०२४ रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख ११/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

---

## *तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय*

(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१०/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्या अर्थी अर्जदार प्रशांत संग्राम तोंडारे रा. सरस्वती कॉलनी उदगीर यांचा जन्म दिनांक १९/०२/१९८८ रोजी मौजे देऊळवाडी. ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार प्रशांत संग्राम तोंडारे रा.सरस्वती कॉलनी उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक १९/०२/१९८८ ची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०९/०९/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक १९/०२/१९८८ रोजी मौजे देऊळवाडी ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार प्रशांत संग्राम तोंडारे रा. सरस्वती कॉलनी उदगीर यांचा जन्म दिनांक १९/०२/१९८८ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय देऊळवाडी ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल. आज दिनांक १०/०९/२०२४ रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख ११/१०/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

---

# ग्राम पंचायत कार्यालय मलकापुर ता.उदगीर जि.लातूर

## जाहीर प्रगटन

तमाम नागरिकांना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, मलकापुर ग्राम पंचायत हद्दितील खालल प्लॉट मालकांनी/घर मालकांनी आपल्या प्लॉटची/घराचे नामांतर होण्यासाठी आवश्यक पुरावा आणि दस्तऐवज दाखल केल्याने खालील प्लॉटच्या, घरच्या मालकी हक्काबाबत इतर कोणाचे हक्क संबंध हरकती असतील तर आजपासुन पुढील तारखेपर्यंत म्हणजेच दि. २४/०९/२०२४ पर्यंत सबळ पुराव्यासह ग्राम पंचायत कार्यालय, मलकापुर येथे हरकती सादर कराव्यात ज्या प्लॉटच्या/घरच्या संदर्भात तक्रारी/हरकती नाही त्यांची नोंद/फेरफार कायदेशिरित्या मुदतीनंतर केले जाईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. म्हणून हे जाहीर प्रगटन देत आहोत कृपया संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | लिहुन घेणार | लिहून देणार | मिळकतीचे वर्णन | चर्तुः सिमा | ख.ख.नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | बंबर वजीरसाब शेख मु.पो. तोंडार | बालाजी गृहनिर्माण सहकारी संस्था म. मलकापुर ता.उदगीर जि.लातूर | प्लॉट क्र. ३१ सर्वे नं. ४८ ४०X ४५ | पु - प्लॉट नं. ३० प- प्लॉट क्र. ३२ द- रोड व गार्डनची जागा उ- प्लॉट नं.१८ | नो.क्र. LTR(UGR) HSF (to 905/84-85) दि. १/१२/१९८४ |
| २ | दिलीप माधवराव इंद्राळे रा. कारेगाव रोड, दत्त नगर, परभणी जि.परभणी | शंकर अण्णाराव पोस्ते रा. न्यु. मोंढा पोलीस वसहत जवळ उदगीर ता.उदगीर जि.लातूर | स.नं. ४५ प्लॉट नं. ०९ पु.प.द.बा. १४.३६ मिटर पु.प.उ.बा. १४.३८ मिटर द.उ.दो.बा.७.६२ मिटर | पु - ९ मी रस्ता प- स.न. ४५ मधील जमीन द- प्लॉट नं. १० उ- प्लॉट नं. ८ | २२८३ २०२४ दि २४/०४/२०२४ ३.४३ मि. |
| ३ | दिलीप माधवराव इंद्राळे रा. कारेगाव रोड, दत्त नगर, परभणी जि.परभणी | शंकर अण्णाराव पोस्ते रा. न्यु. मोंढा पोलीस वसहत जवळ उदगीर ता.उदगीर जि.लातूर | स.नं. ४५ प्लॉट नं. १० पु.प.द.बा. १४.३४ मिटर पु.प.उ.बा. १४.३६ मिटर द.उ.दो.बा.७.६२ मिटर | पु - ९ मीटरचा रोड प- सर्वे नं. ४५ मधील जमीन द- प्लॉट नं. ११ उ- प्लॉट नं. ०९ | २२८३ २०२४ दि २४/०४/२०२४ ३.४३ मि. |
| ४ | मोहम्मदसाब हबीबसाब शेख रा. संत सैलानी गल्ली उदगीर ता.उदगीर जि.लातूर | मोईन गुलाम रसुल मुनशी पैगंबरपूरा उदगीर ता.उदगीर जि.लातूर | स.नं. ३८/१/२ प्लॉट नं. ३५ पु.प. ४० फुट द.उ. ३० फुट एकुण १२०० चौ.मी. | पु -२० फुटाचा रोड प- बालाजी पवार यांची जमीन द- प्लॉट नं. ३४ उ- प्लॉट नं. ३६ | दि.दा.क्र. २९८/२०२३ दि. ११/२/२०२३ |
| ५ | विठ्ठल पि. दत्तात्रय भांगे रा. वाढवणा ता.उदगीर जि.लातूर | सारीका भ्र. धनाजी भांगे रा. वाढवणा ता.उदगीर जि.लातूर | स.नं. ४७ प्लॉट नं. २८ पु.प. ३५ फुट द.उ. २० फुट एकुण ७०० चौ.मी. | पु - प्लॉट नं. २९ प- १५ फुटाचा रोड द- प्लॉट नं. २३ उ- प्लॉट नं. २८ पैकी | दि.दा.क्र. ४७०/२०२४ दि. २७/७/२०२४ |
| ६ | मिनाजबी इस्माईल शेख रा. गणेशवाडी ता.उदगीर जि.लातूर | नंदा हिरामन सुळकेकर | स.नं. ४८ प्लॉट नं. ३३ ग्रा.पं. नं. २८५८ पु.प. ४० फुट, उ.द. ४५ | पु - २० फुट रोड प- प्लॉट नं. ३४ द- २० फुट रोड उ- प्लॉट नं. १६ | नो.क्र. LTR(UGR) HSF (to 905/84-85) |
| ७ | शहनाज परवेझ शेख रा. बनशेळकी रोड, मदीना मस्जीद, उदगीर जि.लातूर | अर्चना केशव तिरकमटे रा. वाढवणा ता.उदगीर जि.लातूर | स.नं. ४७ प्लॉट नं. ३२ ग्रा.प. ३२११ पु.प. १०.६७ मी द.उ. १५.२४ मी | पु - प्लॉट नं. ३३ प- ६.९ मी रोड द- ६.९ मी. रोड उ- प्लॉट नं. ३१ | द.क्र. ४९०६ २०२४ २९/०८/२०२४ ४.५५ म.नं. |
| ८ | अनुराधा गौतम कांबळे रा. चवणहिप्परगा ता.देवणी जि.लातूर | वर्षा नारायण शिंदे रा. जयभिम नगर एस.टी.कॉलनी मलकापूर जि.लातूर | स.नं. २७/१ प्लॉट नं. ४ व ५ मधील ग्रा.पं. नं. ५०१२ पु.प.२२.६ फु द.उ २९ फु | पु- ३० फुटाचा रोड प- प्लॉट नं. ७ द-प्लॉट नं. ५ मधील भाग उ- प्लॉट नं. ०३ | द.क्र. ३५०२ २०२४ २०/०६/२०२४ ३:३० मी |
| ९ | सचिन रामचंद्र धुर्वे रा. मलकापूर ता.उदगीर जि.लातूर | केशव रामचंद्र धुर्वे व इतर | स.नं. ४८ प्लॉट नं. ६० ग्रा.पं. नं. ४४७ पु.प.उ.बा.४० फु पु.प.द.बा. ७० फु | पु -प्लॉट नं. ६९ प-प्लॉट नं. ५७,५८ द-प्लॉट नं. २४,२५ उ-ग्रा.पं.रस्ता | दि.दा.क्र. ४१/२०२४ दि. २७/७/२०२४ |
| १० | शशांक मनोहर बंडे रा. रेड्डी कॉलनी उदगीर ता.उदगीर जि.लातूर | मनोहर निवृत्तीराव बंडे | स.नं. प्लॉट नं. ३६ ग्रा.पं.नं. २९३२ पु.प. उ.बा. ५५ फु. प.पु.द.बा. ५० फु. | पु - २० फुट रोड प- प्लॉट नं. ३४ द- २० फुट रोड उ- प्लॉट नं. ३५ | दि.दा.क्र. ३२८/२०२० दि. २९/१०/२०२४ |
| ११ | सुभाष बाजीराव चव्हाण रा. हिप्परगा ता.उदगीर जि.लातूर | निलेश बालाजी बिरादार रा. मलकापुर ता.उदगीर जि.लातूर | स.नं. ६१/१/ब प्लॉट नं. १ मधील रो.हाउस ने.सी.५/ग्रा.प. ४००२ पू.प. ४३ फुट द.उ.२२ फुट | पु-रो.हाउस नं.डी. ११ प-२५ फुटाचा रोड द-रो.हाउस नं.सी. ६ उ- रो.हाउस नं.सी. ४ | द.क्र. १६१६ २०२२ २३/०३/२२ ११:०६ मि. |

नोट :- १) ग्राम पंचायतची मासिक सभा झाल्यानंतरच नमुना नं. ८ ची नक्कल मिळेल.
२) नजर चुकीने न्यायप्रविष्ठ प्रकरण व डबल रजिस्ट्री नोंद झाल्यास रद्द करण्याचे अधिकार ग्राम पंचायतला असतील.

ग्रामसेवक उपसरपंच सरपंच

**ग्राम पंचायत कार्यालय मलकापुर ता.उदगीर जि.लातूर**


**उदगीर मनोरंजन**

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,५:३०,८:३०
दररोज ४ शो







**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया, अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे, सचिव



## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७१४/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Digambar S/o. Baburao Bachchewar and Prabhavati W/o Digambar Bachchewar हे R/o Udgir Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक०८/१०/२०२० and १६/११/२०२० रोजी At.Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Balaji S/o. Digambar Bachchewar, Age-55, Occu-Business R/o. Gavali Galli, Chaubara Road, Udgir Dist. Latur A/p. Shashtri Nagar, Kothrud, Pune
2) Manojkumar S/o. Digambar Bachchewar, Age-49, Occu - Service R/o. Gavali Galli, Chaubara Road, Udgir Dist. Latur
3) Sangita W/o. Balaji Rudrawar, Age-51, Occu-H.H. R/o. Sundar Nagari, Azad Nagar, Kothrud, Pune

यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Balaji S/o. Digambar Bachchewar | 55 | Son |
| 2) | Manojkumar S/o. Digambar Bachchewar | 49 | Son |
| 3) | Sangita W/o. Balaji Rudrawar | 51 | Daughter |

अर्जदार यांना Digambar S/o. Baburao Bachchewar and Prabhavati W/o Digambar Bachchewar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Digambar S/o. Baburao Bachchewar and Prabhavati W/o Digambar Bachchewar याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १७/१०/२०२४

| | |
|---|---|
| के.डी. सुर्यवंशी | एम.एल.सुत्राळे |
| कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक |
| २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर | सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर |

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.एन.जे.चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७३१/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Vishwanath S/o Sidramppa Aambegave हे दिनांक १८/०५/२०२२ रोजी At.Banshelki Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1. Vimalbai w/o Vishwanath Aambegave वय ७५ वर्षे नाते पत्नी
2 Mahadev s/o Vishwanath Aambegave वय ५५ वर्षे नाते मुलगा
3 Shesherao s/o Vishwanath Aambegave वय ५२ वर्षे नाते मुलगा
4 Sangamma w/o Aanandrao Nagalgave वय ५० वर्षे नाते मुलगी
5 Parvati w/o Chandrakant Masette वय ४८ वर्षे नाते मुलगी
At.Banshelki Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1. | Vimalbai w/o Vishwanath Aambegave | ७५ | पत्नी |
| 2 | Mahadev s/o Vishwanath Aambegave | ५५ | मुलगा |
| 3 | Shesherao s/o Vishwanath Aambegave | ५२ | मुलगा |
| 4 | Sangamma w/o Aanandrao Nagalgave | ५० | मुलगी |
| 5 | Parvati w/o Chandrakant Masette | ४८ | मुलगी |

अर्जदार यांना Vishwanath S/o Sidramppa Aambegave या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Vishwanath S/o Sidramppa Aambegave याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०९/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०४/११/२०२४

| | |
|---|---|
| डी.ए.कांबळे | एम.एल.सुत्राळे |
| कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक |
| ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर | सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर |

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७३४/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Tukaram Dattaram Patil हे R/o Udgir Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक०१/०८/२०२४ रोजी At.Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Shankar Tukaram Patil, Age-35, Occu - Agri R/o. Janapur Tq. Udgir Dist. Latur
2) Pramod Tukaram Patil, Age-30,
3) Kiran Tukaram Patil, Age21, Occu. - Agri
4) Shivnanada Tukaram Patil, Age-60, Occu-H.H. R/o. Udgir
